A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संतांच्या कवितेतील पर्यावरणीय संवेदन

प्रा डॉ सचिदानंद फुलचंद खडके
मराठी विभाग, शारदा महाविद्यालय परभणी.

पर्यावरणाचा समतोल बिघडल्यामुळे संपूर्ण जगाला अनिष्ठ परिणाम भोगावे लागत आहेत. सातत्याने पृथ्वीचे तापमान वाढत असून एकीकडे चक्रीवादळ, महापूर तर दुसरीकडे प्रचंड दुष्काळ यामुळे माणसाचे जगणे वरचेवर असुरक्षित होऊ लागले आहे. माणसाबरोबरच या पृथ्वीतलावरील संपूर्ण सजीवांचे जीवनही धोक्यात आले आहे. बदलत्या हवामानामुळे अनेक प्राणी-पक्षी, वृक्षवेली नामशेष झाल्या आहेत; आणि होत आहेत. त्यामुळे संपूर्ण सृष्टिचक्र बिघडले आहे की काय असे वाटू लागले आहे परंतु या सर्व अनिष्ट बदलास मनुष्यच जबाबदार आहे. पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास व अमर्याद लूट मानवाने आजपर्यंत केली आहे; आणि करत आहे. माणसाचा हा हावरेपणा संतांच्या लक्षात आल्यावाचून कसा राहील. म्हणून संतांच्या साहित्यातून पर्यावरणावरही उत्तम भाष्य आले आहे.

माणसाला सुंदर व निर्भेळ जीवन जगण्यासाठी निसर्गाची साथ असायलाच हवी. मानवाचे जीवन सुखी व समृद्ध होण्यासाठी माणसाने काय करायला पाहिजे हे सांगताना संत ज्ञानेश्वर म्हणतात,

"नगरेचि रचावी । जळाशये निर्मावी।
महावने लावावी। नानाविधे।। " ३९

नगरांची रचना करताना जलाशयासह, उपवनांची निर्मिती करावी, असे ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. महावने व जलाशय असतील तर वातावरण सुद्धा प्रदूषित होणार नाही. पक्ष्यांच्या गुंजारवासोबतच सगळीकडे आनंदी आनंद असेल. आठशे वर्षांपूर्वी संतांनी महानगरांची निर्मिती करताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे ते सांगितले आहे, परंतु आजमितिला भारतात कोणतीही राजवट येवो अशा पद्धतीचा शाश्वत विकास व विचार कोणीही करताना दिसत नाही. परतु नगररचना करताना आजच्या काळातही संत ज्ञानेश्वरांचे विचार किती महत्वाचे कालातीत आहेत, याची जाणीव प्रकर्षाने होते. भारतात एकेकाळी ४७ टक्के क्षेत्र वनांनी, जंगलानी व्यापलेले होते, आज मात्र त्यामध्ये लक्षणीय घट झालेली 3 असून 3 आज केवळ ८ टक्के जंगल शिल्लक राहिले आहे. त्यामुळे संत ज्ञानेश्वरांनी आठशे वर्षांपूर्वी सांगितलेला सल्ला अमलात आणला तर पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य होईल. अन्यथा मानवाला अनेक संकटांना सामोरे जावे लागेल.

आजच्या जगात माणसांत माणूस राहिलेला नाही. धर्म, पंथ, जाती, उपजाती यामध्ये माणूस विभागला गेला आहे. त्यामुळे संपूर्ण जगात यादवी सदृश्य स्थिती निर्माण झाली आहे, आपण एकीकडे संतांचा

वारसा सांगत असतानाच दुसरीकडे जातीपातीच्या उतरंडी मजबूत करतो आहोत. अशावेळी आपण सर्वांनी संतांचे विचार समजून घेऊन आमलात आणणे गरजेचे आहे.

"स्मशानींच आम्हा न्याहालीचे सुख । या नावे कौतुक तुमची कृपा ।।१।।
नाही तरी वाया अवघे निर्फळ । शब्द ते पोकळ बडबड ।।२।।
झाडेझुडे जीव सोईरे पाषाण । होती तई दान तुम्ही केले ।।३।।
तुका म्हणे आता पाहे अनुभव । घेऊनी हाती जीव पांडुरंगा ।।४।।४°

माणसाच्या मनातील संकुचितपणा संपला तर त्याला ईश्वराची खरीखुरी कृपा झाली असे मानता येईल अशी भावना संत तुकारामांनी आपल्या अभंगातून व्यक्त केली आहे. यावर भाष्य करताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, "आम्ही स्मशानात असतानाही गादीवर झोपलो आहोत, असे वाटण्याइतकी आमची चित्तवृत्ती स्थिर झाली, तरच तुमची आमच्यावर कृपा झाली, असे म्हणता येईल. मनामध्ये इतके संतुलन निर्माण झालेले नसेल, तर सगळेच वाया गेल्यासारखे, निष्फळ झाल्यासारखे होईल. शब्द म्हणजे अर्थहीन अशी केवळ बडबड ठरेल. झाडेझुडपे, सर्व प्रकारचे जीव, एवढेच नव्हे, तर अगदी पाषाणदेखील आपले सोयरे आहेत. आप्त आहेत अशी विशाल दृष्टी प्राप्त झाली, तर तुम्ही खऱ्या अर्थाने जे इष्ट ते आम्हाला दिल्यासारखे होईल." अशी विशाल दृष्टी निर्माण होणे गरजेचे आहे परंतु आज सगळीकडे याच्या उलट स्थिती निर्माण झाली आहे. विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे जग जवळ आले आहे परंतु माणूस मात्र माणसापासून दुरावत चालला आहे. अशावेळी आपल्याला संतांच्या विचारांचा समृद्ध वारसाच महत्वाचा आहे. मानवच काय तर संपूर्ण चराचर सृष्टी एक आहे त्यात कुठलाही भेद नाही हे सांगताना संत तुकाराम महाराज म्हणतात,

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।१।।
येणे सूखे रुचे एकांताचा वास ।
नाही कळो येत दुःख अंगा ।।२।।
आकाश मंडप पृथ्वी आसन । रमे तेथे मन क्रीडा करी ।।३।।
कंथा कमंडलू देह उपचारा ।
जाणवितो वारा अवसरू ।।४।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार ।
करूनि प्रकार सेऊ रुची ।।५।।
तुका म्हणे होय मनाशी संवाद ।
आपूलचि वाद आपणासी ।।६।। '

या संदर्भाने डॉ रामचंद्र देखणे म्हणतात, "वृक्षवल्ली वनात चरणारे तसेच सुस्वर कंठाने आळवणारे पक्षी हे सर्व आमचे सोयरे आहेत." संत तुकाराम महाराज म्हणतात, त्यांच्या बरोबर एकांतात राहणे मला आवडते. तेथे कोणताही गुणदोष अंगाला लागत नाही; आकाशाचा मंडप आणि पृथ्वीचे आसन ज्या ठिकाणी असते,जेथे मन रमते तेथे क्रीडा करते. देह उपचारासाठी गोधडी व कमंडलू माझ्याजवळ आहेत. प्रसंगी वारा जाणवतो. हरी कथेचे भोजन आहे. त्याचा विस्तार करून निरनिराळ्या प्रकारचे रुची त्या भोजनात सेवन करतो. अशावेळी माणसाचा मनाशी संवाद होतो असे संत तुकाराम महाराज म्हणतात. त्यानंतर आपला आपणाशी वादविवाद होतो. वृक्षवल्लीच्या सानिध्यात मन रमून गेले की आपणच आपल्या मनाशी संवाद करू लागतो. अशावेळी वृत्ती अंतर्मुख होते व बाह्यदोष नाहीसे होतात. म्हणूनच ही वसुंधरा, हा निसर्ग याला जाणणे हे माणसाचे आद्य कर्तव्य आहे. म्हणजेच संत तुकाराम महाराजांसह अनेक संतांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपले विचार मांडले आहेत.

संत सावता माळी यांनीही परमेश्वराचे खरे स्वरूप कोणते आहे व खरा आनंद कोठे प्राप्त होतो हे खालील अभंगातुन सांगितले आहे.

"आमुची माळीयाची जात । शेत लावू बागाईत ।
आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ।
शांती शेवंती फुलली । प्रेम जाई जुई व्याली ।
सावत्याने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ।

संत सावता माळी यांनी आपला मळा फुलवता फुलवता विठ्ठलाची भक्ती केली, त्यांनी कुठल्याही तीर्थयात्रा केल्या नाहीत. आपल्या कर्मातच परमेश्वराचे रूप पाहिले त्यामुळे येथे कर्मसिद्धांत श्रेष्ठ ठरतो. सर्व संतांच्या पालख्या पांडुरंगाला भेटण्यासाठी पंढरपुरला जातात. मात्र पांडुरंगाची पालखी ही सावता महाराजांच्या शेतात येते. कुठेही न जाता प्रत्यक्ष देवच संत सावता महाराजांना भेटावयाला शेतात येतो. याचा अर्थ एवढाच आहे की देवाला भेटायला तीर्थयात्रेला जाण्याची गरज नाही, जप तप व कुठलेही अवडंबर करण्याची गरज नाही; तुम्ही तुमचे दररोजचे कर्म करत रहा देव प्रत्यक्ष त्यातूनच भेटतो असे सूचित केले आहे. म्हणजे सावता महाराजांना देव निसर्गातून, जाई, जुई, शेवंतीमधून देव भेटला; म्हणजेच आपला मळा फुलताना त्यांना जो एक आनंद प्राप्त झाला. मळा सुंदर करताकरताच आपले जीवनही सुंदर झाले. म्हणजेच प्रत्यक्ष कृतीमधून संतांनी परमेश्वराचे खरे स्वरूप व खरी आनंदप्राप्ती कोठे आहे हे ओळखले होते. तत्कालीन लोकजीवन हे शेतीवर अवलंबून होते व शेतीशी निगडित उद्योग व्यवसायही होते, त्यामुळे या ना त्या कारणाने प्रत्येकजण शेती व शेतातील वृक्षवेलींशी जोडलेला होता. तो जितका प्रामाणिकपणे त्यात एकरूप झाला त्यांना-त्यांना खरा आनंद

भेटला; परमेश्वर भेटला. म्हणून संतांच्या कवितेतून इतर शेती विषयक संदर्भ पाहत असताना खरा आनंद, खऱ्या परमेश्वराचे स्वरुप काय आहे हे सर्वच संतांनी आपल्या अभंगातून वेळोवेळी सांगितले आहे. संतांचा हा उपदेश लक्षात घेता मनुष्य जीवनात खऱ्या आनंदाची प्राप्ती कोठे आहे. याची माहिती मिळते आणि त्यातून आपले जीवन सुखी आणि आनंदी करता येते.

**संदर्भ सूची**

१ वि.का.राजवाडे, श्री ज्ञानेश्वरी, अध्याय १३, ओवी ५६४, पृ.४६८
२ वि.का.राजवाडे, उनि, ओवी ९७२, पृ.५०४
३ बा.रं. सुंठणकर, महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य, पृ.१५
४ वि.का.राजवाडे, श्री ज्ञानेश्वरी, अध्याय १८, ओवी २५०, पृ.७३२
५ वि.का.राजवाडे, उनि, अध्याय १८, ओवी ५६६,पृ.७६०

**संतांच्या कवितेतील पर्यावरणीय संवेदन**

प्रा डॉ सचिदानंद फुलचंद खडके